आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२३

ठळक बातम्या

- आशियाई क्रीडास्पर्धेत भारताचं पदकांचं शतक, पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून विजेत्यांचे अभिनंदन, नागपूरच्या ओजस देवतळेची नेत्रदीपक कामगिरी.
- जगातील पहिल्या पाच आरोग्यसेवा उपकरणे उत्पादकांमध्ये भारताचा समावेश, भारताच्या उत्पादनांची किंमत तुलनेने कमी - केंद्रीय मंत्री डॉ.जितेंद्र सिंह यांची माहिती.
- अकोला इथले सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने सुरू करणार- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन.

आणि

- सुमारे ११ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या महिला नक्षलीचे आज गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण.

********

अशियाई क्रीडा

चीनमधील हांगझोऊ इथ सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने १०३ पदकं मिळवली आहेत. २८ सुवर्ण पादकांच्या त्यात समावेश आहे. १०३ पदके जिंकून भारत चौथ्या स्थानावर असून, आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी या जोडीनं बॅडमिंटन दुहेरीमध्ये ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकलं. पुरुषांच्या क्रिकेट संघानंही अफगाणिस्तानला नमवून सुवर्णपदक मिळवलं. महिला आणि पुरुषांच्या संघानं कबड्डीमध्ये आणि नागपूरच्या ओजस देवतळे तसंच ज्योती सुरेखा वेण्णम यांनी कंपाऊड तिरंदाजीमध्येही आज सुवर्णपदक पटकावलं. तेजसच्या नेत्रदीप कामगिरेचं सर्वस्तरातून कौतुक होत आहे. आज सकाळी महिलांच्या वैयक्तिक तिरंदाजी सामन्यांमध्ये ज्योती सुरेखा वेन्नमनं सुवर्ण आणि अदिती गोपीचंद स्वामीने कांस्यपदक जिंकलं. आशियाई क्रीडा स्पर्धेत विक्रम नोंदवत ज्योतीनं अंतिम फेरीत दक्षिण कोरियाच्या सो सीचा १४९-१४५ अशा फरकानं पराभव केला. अदितीनं इंडोनेशियाच्या रतिह फादलीविरुद्ध १४६-१४० अशा फरकानं विजय मिळवला. राष्ट्रपदी द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या

कामगिरीबद्दल खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. क्रीडा आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकुर यांनीही भारतीय एथलेटिक चमूचं अभिनंदन केलं आहे.

डॉ.जितेंद्र सिंह

उच्च तंत्रज्ञान आधारित वैद्यकीय उपकरणांच्या जागतिक स्पर्धेत भारत जगातील पहिल्या पाच आरोग्यसेवा उत्पादकांमध्ये समाविष्ट झाला असून भारताची उत्पादने तुलनेने कमी खर्चाची असल्याचे केंद्रीय मंत्री डॉ.जितेंद्र सिंह यांनी आज सांगितले. भारत जीव रक्षक उच्च-जोखीम वैद्यकीय उपकरणे तयार करत आहे परंतु त्याची किंमत जगातील इतर उत्पादनांच्या तुलनेत अगदी कमी आहे, असेही त्यांनी सांगितले. नवी दिल्ली येथे कन्सोर्टियम ऑफ अॅक्रेडिटेड हेल्थकेअर ऑर्गनायझेशन (**CAHO**) द्वारे आयोजित 8व्या **CAHOTECH,** वार्षिक आंतरराष्ट्रीय आरोग्य सेवा तंत्रज्ञान परिषदेत डॉ जितेंद्र सिंह उद्घाटनपर भाषणात बोलत होते. वैद्यकीय उपकरण उत्पादन क्षेत्र हे देशातील वाढीची मोठी क्षमता असलेल्या उदयोन्मुख क्षेत्रांपैकी एक मानले जाते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भारताला उत्पादन केंद्र बनवण्यासाठी शक्य ती सर्व पावले उचलत आहे, असे डॉ.जितेंद्र सिंह म्हणाले.

स्वामिनाथन लेख

प्रसिद्ध कृषी शास्त्रज्ञ प्रोफेसर एमएस स्वामीनाथन यांनी कृषी क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दलच्या आठवणींना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या लेखातून उजाळा दिला. स्वामिनाथन यांनी केलेल्या कार्यामुळे भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केलं असल्याचं मत मोदी यांनी व्यक्त केलं. देशानं एक दूरदर्शी व्यक्ती गमावला असून, ज्यांच योगदान नेहमीच सुवर्णाक्षरांनी कोरलं जाईल असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या लेखामध्ये म्हटलं आहे. प्रा. स्वामीनाथन यांच्या गहू संशोधनातल्या अग्रगण्य कार्यामुळे गव्हाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली असल्यांचं त्यांनी म्हटलं आहे. आज जग बाजरी किंवा श्रीअन्न यांना सुपरफूड म्हणून संबोधत आहे, परंतु प्रा. स्वामीनाथन यांनी १९९० च्या दशकापासून बाजरीचं महत्व अधोरेखित केलं होतं. या लेखात प्रा. स्वामीनाथन यांच्याशी यांच्याशी झालेल्या संवादाबाबत सांगताना त्यांनी मृदा आरोग्य कार्ड योजनेबाबत मौल्यवान मार्गदर्शन केल्याचं सांगितलं.

विश्वकर्मा **PIDF**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांचा पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड अर्थात **PIDF** योजनेत समावेश करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. पीआयडीएफ योजनेला आणखी दोन वर्षांच्या कालावधीसाठी म्हणजेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचाही प्रस्ताव दिला आहे.

केंद्रिय मंत्री- नितीन गडकरी

बसची बांधणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या मानकांना केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांनी मान्यता दिली आहे. ही मानकं मूळ उपकरणं उत्पादक आणि बसचा सांगाडा बांधणारे कारागीर या दोघांनाही एकसमान लागू होतील अशी माहिती समाज माध्यामावर प्रसारित करण्यात आलेल्या संदेशांत देण्यात आली आहे. यामुळे भारतातील बसगाड्यांच्या गुणवत्तेत आणखी सुधारणा करण्याचा मार्ग मोकळा होईल असं गडकरी यांनी सांगितलं.

राधाकृष्ण विखे पाटील

दुधाळ जनावरांसाठी राज्यात प्रायोगिक तत्वावर सहा भृण प्रत्यारोपण प्रयोगशाळांची स्थापना करण्यात आहे, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर सह प्रत्येक महसुल विभागात या प्रयोगशाळेच्या माध्यमातून फिरत्या वाहनाद्वारे शेतकऱ्यांच्या घरांपर्यंत ही सेवा पोहचणार आहे.

देवेंद्र फडवणीस

आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्य शासनाने मोठा निधी उपलब्ध करून दिला असून, अकोला येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. अकोल्याच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रूग्णालय येथे दोनदिवसीय महाआरोग्य शिबिराचा शुभारंभ, तसेच शिवापूर येथील उपजिल्हा रूग्णालयाचे भूमिपूजन, बोरगाव मंजू येथील ग्रामीण रूग्णालयाचे भूमिपूजन, हुतात्मा स्मारकातील जिल्हयातील हुतात्मा झालेल्या शहिदांच्या स्मारकाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज झाले त्यावेळी ते बोलत होते. अकोला येथील रूग्णालयात वॉर्डसाठी **65** कोटी आणि बाहय रूग्ण विभागासाठी **85** कोटी असा एकूण **170** कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, पुढील

योजनांसाठी 950 कोटी रूपयांच्या निधीचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे दाखल करण्यात येत आहेत. अतिविशेषोचार रूग्णालयासाठी केंद्र शासनाने 120 कोटी आणि राज्य शासनाने 40 कोटी रु. निधी दिला. प्रधानमंत्री जनविकास योजनेतून 46 कोटी रू. निधीतून 100 खाटांचे शिवापूर येथे उपजिल्हा रूग्णालय, तसेच बोरगाव मंजू येथे ग्रामीण रूग्णालय निर्माण होणार आहे. सर्वोपचार रूग्णालयालाही निधी मिळवून दिला जाईल असं ते म्हणाले.

राज्यपाल-रमेश बैस

देशातल्या २० ते ३० वयोगटातल्या युवकांमध्ये वाढत असलेलं हृदयविकाराबद्दल राज्यपाल रमेश बैस यांनी चिंता व्यक्त केली आहे. हे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी हृदयविकार तज्ञांनी मार्गदर्शन करावं असं आवाहन त्यांनी केलं. 'कार्डियाक इमेजिंग आणि क्लिनिकल कार्डिओलॉजी' या विषयावरच्या तिसऱ्या जागतिक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते मुंबईत बोलत होते. इमेजिंग सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी लागणारी आधुनिक वैद्यकीय उपकरणे देशात तयार झाली तर इमेजिंग चाचण्यांचा खर्च कमी होईल, असं ते म्हणाले. हृदयरोग आणि त्यासाठी लागणारा रोगनिदान खर्च आयुष्मान भारत सारख्या योजनेतून मिळाला तर त्याचा गरीब कुटुंबांना मोठा फायदा होईल असंही राज्यपाल म्हणाले.

पालकमंत्री-संजय राठोड

सध्या अनेक भागात मानव आणि वन्यप्राण्यांमध्ये संघर्षाच्या घटना घडत आहेत. शेतीपिकांचे अतोनात नुकसान वन्यप्राण्यांमुळे होत आहे अशा घटना रोखण्यासाठी जिल्ह्यातील १६ तालुक्यातील शेतकऱ्यांना बॅटरीवर चालणाऱ्या झटका मशीन देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली. शेतकऱ्यांना झटका मशीन देण्यासाठी पालकमंत्री संजय राठोड यांच्या संकल्पनेतून जिल्हा खनिकर्म योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून ५० कोटींची तरतूद केली आहे.

मियावाकी प्रकल्प

यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रसच्या पर्यटन वैभवात भर घालणारा अटल आनंदवन घनवन म्हणजेच मियावाकी प्रकल्प नव्या पिढीला वनसंवर्धन व संरक्षणाची प्रेरणा देणारा ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. पुसद वन विभागाने दिग्रस शहराजवळील

भवानी टेकडी परिसरामध्ये उभारलेल्या अटल आनंदवन घनवन या मियावाकी प्रकल्पाचे उद्घाटन  पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

नक्षलीचे आत्मसमर्पण

सुमारे ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलेल्या जहाल महिला नक्षलीने आज पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्यापुढे आत्मसमर्पण केले. २८ वर्षीय रजनी उर्फ कलावती समय्या वेलादी असे आत्मसमर्पित नक्षलीचे नाव असून, ती छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यातील ईरुपगट्टा इथली रहिवासी आहे. रजनी वेलादी ही २००९ मध्ये छत्तीसगडमधील फरसेगड दलममध्ये भरती झाली. त्यानंतर ओरछा दलम, नॅशनल पार्क दलम आणि सांड्रा दलममध्ये ती कार्यरत होती. ४ चकमकी, १ खून आणि १ जाळपोळीच्या गुन्ह्याची तिच्यावर नोंद आहे. आत्मसमर्पण योजनेंतर्गत तिला साडेचार लाख रुपयांची मदत करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. २०२२ पासून आतापर्यंत १३ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केल्याचे नीलोत्पल यांनी सांगितले.

ऑनलाईन अर्ज

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या बारावी परीक्षेसाठी ९ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर दरम्यान नियमित शुल्कासह ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येतील.

******